# मानक क्र. ९९

**४.१०.१ शाळा मुलींना भेदभाव विरहित क्रीडा, STEAM संधी, कलाशिक्षण, व्यवसायिक शिक्षण व संरक्षण प्रशिक्षण इत्यादी प्रदान करते तसेच संक्रमणाचा मागोवा घेऊन पुढील शिक्षणाची संधी देते.**

**निवडलेला स्तर : ४**

४.१ शाळा निश्चित धोरणे राबवून आणि सूक्ष्म नियोजनाद्वारे अंमलबजावणी करून विद्यार्थीनीचे स्थैर्य सुनिश्चित करते.

४.२ विद्यार्थिनी आत्मनिर्भरतेने वावरतात.

**१.१ शाळेत मुलींना शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात समान संधी देण्यास प्रोत्साहन व नियोजन केले जाते.**

कनिष्ठ महाविद्यालयात मुलींना शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात समान संधी मिळाव्यात यासाठी विशेष प्रोत्साहन व नियोजन केले जाते. शैक्षणिक, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये मुलींचा सहभाग वाढावा यासाठी विविध कार्यक्रम राबवले जातात. त्यांना आत्मनिर्भर आणि सक्षम बनवण्यासाठी नेतृत्व विकास कार्यशाळा, मार्गदर्शन सत्रे आणि प्रेरणादायी व्याख्याने आयोजित केली जातात.

## Equal Opportunity Policy

**1. Gender Sensitization**

- Evaluate the effectiveness of gender sensitization initiatives and make necessary improvements.
- Introduce a zero-tolerance policy towards gender discrimination.
- Celebrate achievements in gender equality within the institution.

**2. Women Empowerment**

- Expand networking opportunities for women within and outside the institution.
- Implement policies to ensure equal opportunities in all aspects of institutional life.

**3. Personality Development**

- Foster an environment that encourages continuous personal growth.
- Utilize alumni networks to provide career guidance.

**4. Legal Guidance**

- Keep the legal information updated.
- Increase awareness about cyber laws and digital rights.

P. B. [signature]

PRINCIPAL
Indira Mahavidyalaya
Kalamb Dist.Yavatmal

**२.१ सर्व मुलींना शाळेच्या सर्व क्षेत्र व सुविधा पुरविण्यासाठी समावेशित दृष्टीकोन विकसित करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे व्यावसायिक क्षमता विकसन प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.**

कनिष्ठ महाविद्यालयात सर्व मुलींना समान संधी आणि सुविधा मिळाव्यात यासाठी समावेशक दृष्टीकोन विकसित करण्यावर विशेष भर दिला जातो. यासाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात. महिलांचे सशक्तीकरण साधण्यासाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण, केक बेकिंग आणि डिश डेकोरेशन यांसारख्या कौशल्यविकास उपक्रमांचे आयोजन केले जाते. या प्रशिक्षणांमध्ये लैंगिक समानता, समावेशक शिक्षण, विद्यार्थीहित-केंद्रित अध्यापन पद्धती, मुलींच्या शैक्षणिक व मानसिक गरजा, तसेच सुरक्षित आणि सन्मानपूर्वक वातावरण निर्माण करण्याच्या उपाययोजना यांचा समावेश असतो. याशिवाय, संवाद कौशल्य, संवेदनशीलता वाढवण्यासाठी मानसशास्त्रीय प्रशिक्षण, स्वसंरक्षण व आरोग्यविषयक जागरूकता सत्रे, तसेच तंत्रज्ञानाधारित अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण दिले जाते. यामुळे शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक प्रभावी योगदान देता येते आणि एक सकारात्मक व प्रेरणादायी शैक्षणिक वातावरण निर्माण होते.







कौशल्यविकास उपक्रमांचे आयोजन

**३.१ शाळा मुलींना शाळेत टिकवणे (गळती थांबवणे) व संक्रमणासाठी स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे आयोजन करते.**

कनिष्ठ महाविद्यालय मुलींना शिक्षणात सातत्य टिकवण्यासाठी आणि गळती थांबवण्यासाठी विविध उपक्रम राबवते. यामध्ये स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे विशेष आयोजन करून मुलींना आत्मरक्षणाच्या तंत्रांची माहिती दिली जाते. या प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो, सुरक्षा भावना दृढ होते आणि संकटांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होते. यासोबतच, शाळा संक्रमण टाळण्यासाठी मार्गदर्शन सत्रे, प्रेरणादायी व्याख्याने आणि समुपदेशनाच्या माध्यमातून मुलींना शिक्षणाची महत्त्वपूर्णता पटवून देते. अशा उपक्रमांमुळे मुली शालेय जीवनात टिकून राहतात आणि त्यांचे शिक्षण निर्विघ्नपणे पूर्ण होते.




व्याख्याने आणि समुपदेशन देताना शिक्षक

**३.२ शाळा मुलींच्या सर्वंकष शिक्षणासाठी विविध कार्यक्रम राबवते.**

शिक्षक आणि पालकांचा सक्रिय सहभाग वाढवून मुलींसाठी सुरक्षित आणि प्रोत्साहक वातावरण निर्माण केले जाते. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम घेतले जातात. या प्रयत्नांमुळे मुली सर्व क्षेत्रांत पुढे येऊन आपली गुणवत्ता सिद्ध करतात आणि उज्ज्वल भविष्य घडवतात.

महत्वाचे उपक्रम आणि उत्सव:

- सावित्रीबाई फुले जयंती
- स्त्री-पुरुष समानता कार्यक्रम
- महिला दिन उत्सव
- पोलीस अधिकारींसोबत रक्षाबंधन
- दमिनी कार्यक्रम
- महाविद्यालयीन मासिकाला पुरस्कार
- स्तनपान सप्ताह व पोषण सप्ताह उत्सव
- स्तनपान सप्ताह कार्यक्रम
- स्तनपान सप्ताहासाठी ऑनलाईन रांगोळी स्पर्धा
- पोषण सप्ताहासाठी ऑनलाईन डिश डेकोरेशन स्पर्धा
- स्तनपान सप्ताहातील रांगोळी स्पर्धेचा अहवाल
- स्तनपान सप्ताह कार्यक्रम

- पोषण सौंदर्य स्पर्धा

हे सर्व उपक्रम लैंगिक समानता आणि महिलांच्या सशक्तीकरणाला चालना देण्यासाठी प्रभावीपणे राबवले जातात.










महत्वाचे उपक्रम राबवताना शिक्षक

**४.१ शाळा निश्चित धोरणे राबवून आणि सूक्ष्म नियोजनाद्वारे अंमलबजावणी करून विद्यार्थीनीचे स्थैर्य सुनिश्चित करते.**

निश्चित धोरणे राबवून आणि सूक्ष्म नियोजनाद्वारे अंमलबजावणी करून विद्यार्थीनींचे स्थैर्य सुनिश्चित करते. यासाठी संस्थेत विविध समित्या आणि कक्ष कार्यरत आहेत, ज्या मुलींच्या शैक्षणिक, मानसिक आणि सामाजिक स्थैर्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवतात. मनोवैज्ञानिक समुपदेशन कक्ष मुलींच्या मानसिक आरोग्यासाठी मदत करतो, तसेच तरुणांच्या आत्महत्या प्रतिबंध कार्यशाळा घेऊन त्यांना मानसिक तणाव हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. छेडछाड आणि रॅगिंग प्रतिबंधक कक्ष तक्रार निवारण कक्ष आणि अंतर्गत तक्रार समिती विद्यार्थिनींसाठी सुरक्षित आणि आधारदायी वातावरण निर्माण करण्यासाठी कार्यरत आहेत. याशिवाय, लैंगिक छळ प्रतिबंधक समिती आणि कमांडो आणि शिस्त समिती मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेतात. बालविवाह प्रतिबंध कार्यशाळा आयोजित करून मुलींना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक केले जाते. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यांचे शैक्षणिक जीवन स्थिर आणि सुरक्षित राहते.













विद्यार्थिनीं करिता विविध उपक्रमांचे आयोजन

**४.२ विद्यार्थिनी आत्मनिर्भरतेने वावरतात.**

विद्यार्थिनी आत्मनिर्भरतेने वावराव्यात यासाठी संस्थेमध्ये विविध समित्या आणि कक्ष कार्यरत आहेत. मनोवैज्ञानिक समुपदेशन कक्ष, छेडछाडविरोधी कक्ष, विद्यार्थिनी तक्रार निवारण कक्ष, लैंगिक छळविरोधी कक्ष, अंतर्गत तक्रार समिती, तसेच कमांडो आणि शिस्तपालन समिती यांसारख्या उपक्रमांद्वारे

त्यांच्या सुरक्षिततेसह मानसिक आणि सामाजिक स्थैर्यावर भर दिला जातो, तसेच त्यांना मोफत जिम सुविधा सुद्धा उपलब्ध करून दिलेली आहे. यामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि त्या निर्भयपणे शिक्षण व विविध उपक्रमांमध्ये भाग घेतात. महिलांच्या आरोग्य गरजा लक्षात घेऊन सॅनिटरी वेंडिंग मशीनची सुविधा, तसेच महाविद्यालयात सॅनिटरी पॅड्स, विक्री द्वारा उपलब्ध करून देण्यात आले आहे, तसेच विद्यार्थिनी ग्राहक केंद्रामार्फत सॅनिटरी नॅपकिन्स सहज उपलब्ध होतात. या सुविधा त्यांना शैक्षणिक जीवन अधिक सुलभ आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी मदत करतात.













विद्यार्थिनीं करिता विविध सोई-सुविधा

P. B. Mudake.
**PRINCIPAL**
Indira Mahavidyalaya
Kalamb Dist.Yavatmal